## नियमित दिवाणी दावा क्रमांक १४८/२०२२

## निशाणी ५ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र. १ विरुद्ध तुर्तातूर्त मनाई आदेश पारीत होण्याची विनंती केली आहे.

२. मौजे सावंतवाडी, तालुका-सावंतवाडी,जिल्हा-सिंधुदुर्ग येथील श्री पंचम खेमराम महाविद्यालय जवळील सावंतवाडी नगरपरिषदेच्या मालकीच्या मिळकतीतील 'समर्थ स्टोअर्स' या नांवाचा दुकान गाळा ही ''दावा मिळकत'' आहे.

३. वादीची अशी हकिकत आहे की, दावा मिळकतीत वादी गेली ११ ते १२ वर्षे प्रतिवादी क्र.२ सावंतवाडी नगरपरिषद यांच्या जाणीवेत स्टेशनरी व कोल्ड्रींक्सचा व्यवसाय करीत आहे. वादी या कुटुंबातील एकमेव कमावती व्यक्ती असून त्यांच्या कुटुंबाची उपजिवीका करण्याकरीता त्या हा स्टेशनरी व्यवसाय करीत आहे. सन २०१० पासून वादी या दुकान गाळ्यामध्ये स्टेशनरीचा व्यवसाय करीत आहे. महाराष्ट्र दुकाने व आस्थापने (नोकरी व सेवाशर्तीची विनियम) नियम २०१८ अंतर्गत दि. २३/०९/२०१० रोजी या दुकान गाळयाचे नोंदणी प्रमाणपत्र वादीच्या नांवे घेतलेले असून गुमास्ता लायसन्स मिळणेकरीता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर या दुकान गाळयाला गुमास्ता लायसन्स मिळालेले आहे. वादीने हे गुमास्ता लायसन्स वेळोवेळी नुतनीकरण करुन घेतलेले आहे. वादी कायदेशीररित्या हा दुकान गाळा चालवून त्यांची उपजिवीका करीत आहेत. हा दुकान गाळा अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. सावंतवाडी नगर परिषदेने शहर विकास आराखडा ज्यावेळी तयार केला होता त्यावेळी सार्वजनिक जागेतील नगरपरिषदेच्या स्टॉल धारकांची संख्या निश्चित करण्याकरीता सर्वेक्षण झाले आणि अशा स्टॉल धारकांचे पुर्नवसन करणेबाबत ठराव संमत करणेत येऊन

वादीला पुर्नवसन करुन स्टॉल देऊ अशी खात्री देण्यात आली होती. परंतु यास बरीच वर्षे होऊन गेली. प्रतिवादी क्र. २ यांनी त्याबाबत अद्यापही कोणताही ठोस निर्णय दिलेला नाही आणि स्टॉल धारकांचे पुर्नवसन देखील केलेले नाही. असे न करता प्रतिवादी क्र. २ यांच्या आदेशानुसार प्रतिवादी क्र.१ उपकार्यकारी अभियंता यांनी दि. १४/१०/२०२२ रोजी कायम स्वरुपी वीज पुरवठा बंद करणेबाबत वादीला दावा नोटीस दिली आणि वादी व त्यांच्या कुटुंबांला उघड्यावर टाकण्याचा प्रकार करीत आहेत. वादी गरीब असून त्यांच्याकडे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरीता अन्य साधन नाही.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, कोरोना महामारी दरम्यान दावा मिळकत स्टेशनरी शॉप लॉकडाऊनमुळे १ वर्षे बंद ठेवावे लागलेने वादीवर उपासमारीची वेळ आली होती. त्यानंतर पुन्हा व्यवसाय सुरु झाल्यामुळे वादी त्यांच्या कुटुंबाची उपजीवीका करीत आहे. वादीने प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे अनामत रक्कम भरुन या दुकान गाळयात वीज पुरवठा सन २०१० मध्ये घेतला होता. तेव्हा पासून दावा मिळकतीत वीज पुरवठा सुरु असून त्याची नियमित बीले वादी प्रतिवादी क्र.१ कडे भरत आहेत आणि कधीही बीले थकीत नाहीत आणि वादी अधिकृतरित्या वीज वापरतात. वीज पुरवठा आवश्यक सुविधा असून व्यवसाय करण्याकरीता आवश्यक आहे. वीजे अभावी वादीला व्यवसाय करता येणार नाही. वीज आवश्यक गोष्ट असल्याने त्याचा पुरवठा कायद्याने खंडीत करता येणार नाही. वादी दावा मिळकतीमध्ये र्निविवादामध्ये कब्जात असून मुदतीच्या कायद्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ चा कब्जा मागण्याचा अधिकार गेला आहे आणि मालकी हक्क संपुष्टात आला आहे. वादी या दुकानाचे मालक झाले आहेत आणि त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांना बेकायदेशीरपणे विद्युत पुरवठा खंडीत करता येणार नाही. प्रतिवादी क्र. २ हे कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय वादीच्या कब्जे वहीवाटीस हरकत करुन दुकानाचा ताबा घेऊ शकत नाहीत. तसेच वीज पुरवठा खंडीत करु

शकत नाहीत. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी दिलेल्या नोटीसची अंमलबजावणी करुन दावा मिळकतीतील वीज पुरवठा खंडीत करता येणार नाही.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीच्या मागे इमारतीचे काम सुरु आहे. या इमारतीला अधिकृत रस्ता नाही. या इमारतीच्या बांधकाम व्यावसायीकाच्या मागे राहून प्रतिवादी क्र.१ व २ हे सदरची कृती करत आहेत आणि दावा नोटीस देण्याची त्यांचे कट कारस्थान आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी वादींना दि.०६/१०/२०२२ रोजी विद्युत पुरवठा खंडीत करण्याबद्दल दिलेल्या नोटीसला वादीने विस्तृतपणे उत्तर दिलेले असताना प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या आदेशानुसार पुन्हा दि.१४/१०/२०२२ रोजी विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस दिली आहे. यावरुन प्रतिवादी क्र.१ व २ यांचा उद्देश स्पष्ट होत आहे. दावा मिळकतीतील विद्युत पुरवठा खंडीत झालेस त्याचा परिणाम वादीच्या व्यवसायावर होऊन त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येणार आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ हे वादीला दावा मिळकतीतून बेदखल करण्याची आणि जबरदस्तीने दावा मिळकत जमीनदोस्त करण्याची साधार भिती वादीला वाटत आहे. असे झालेस वादी कुटुंबिय रस्त्यावर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी दावा नोटीसमध्ये नमुद केलेप्रमाणे दावा दाखल वेळेस दिवाळी सण असल्याने वीज पुरवठा खंडीत करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्याची वादीने विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र.१ यांना दाव्याचे समन्स व या अर्जाची नोटीस पाठविली असता नि.६ अन्वये समन्स व नोटीस तामील होऊन देखील प्रतिवादी क्र.१ या अर्जाच्या कामी तसेच मूळ दाव्याच्या कामी देखील हजर झालेले नाहीत. सबब या अर्जाच्या कामी आणि दाव्याच्या कामी देखील प्रतिवादी क्र.१ विरुध्द 'एकतर्फा' आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

७. वादीच्या कथनावरुन उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील कारणमिमांसेसह माझे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी त्यांची बाजू सिद्ध करतात का ? | होय. |
| २. | न्यायाचे समतोल वादीच्या बाजूने आहे का ? | होय. |
| ३. | तुर्तातूर्त मनाई आदेश पारीत न केलेस वादीचे अतोनात नुकसान होणार आहे का ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## -:: कारणमिमांसा ::-

८. वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदोपत्री पुराव्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता हा पुरावा मुद्दयांची चर्चा करीत असताना नमुद केला आहे. प्रतिवादी क्र. १ तर्फे कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

९. वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. के. निरवडेकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ विरुध्द एकतर्फा आदेश आहे.

**मुद्दा क्र.१ बाबतः-**

१०. वादीने नि.४ सोबत अ.क्र.१ वर गुमास्ता लायसन्सची संगणकीय प्रत दाखल केली आहे. हे लायसन वादीचे नांवे असून त्यामध्ये दुकानाचे नांव 'समर्थ स्टोअर्स' असे नमुद असून शॉप नं.३ एस पी के कॉलेज रोड, सालईवाडा, सावंतवाडी असा पत्ता नमुद आहे. हे प्रमाणपत्र दि.२५/०१/२०२१ रोजी संगणकीय प्रणालीद्वारे तयार करणेत आले असून पूर्वीचा नोंदणी प्रमाणपत्राचा दिनांक २३/०९/२०१० रोजीचा नमुद आहे. अ.क्र.२ ते ४ वर वादीने अनुक्रमे नोव्हेंबर २०२०, डिसेंबर २०२० व जानेवारी २०२१ मधील विद्युत बिले सादर

केली आहेत. या विद्युत बिलांवर वादीचे नांव नमुद असून दुकान गाळा क्र.३ एस.पी.कॉलेज रोड, सावंतवाडी ४१६५१० असा पत्ता नमुद आहे. गुमास्ता परवानामध्ये नोंदणी पत्राचा क्र.४४ असा नमुद आहे. अ.क्र.५ वर वादीने दावा मिळकत दुकान गाळयाचा पुढील बाजूचा आणि मागील बाजू कडून काढलेला फोटो सादर केलेला आहे. अ.क्र.६ वर प्रतिवादी क्र.१ यांनी वादीला दि.०६/१०/२०२२ रोजी दिलेली नोटीस, अ.क्र.७ वर वादीने या नोटीसला दिलेले उत्तर आणि अ.क्र.८ वर प्रतिवादी क्र.२ यांनी वादीला दिलेली दि.१४/१०/२०२२ रोजीची दावा नोटीस यांच्या छायांकित प्रती दाखल आहेत.

११. प्रतिवादी क्र.२ सावंतवाडी नगरपरिषद यांनी या दाव्याच्या कामी नि.१४ वर त्यांची लेखी कैफियत दाखल केली आहे आणि या लेखी कैफियतीचे अवलोकन केले असता त्यांनी दावा मिळकतीबाबत वादीने प्रतिवादी क्र.२ नगरपरिषद यांचेकडून बांधकामाबाबत रितसर परवानगी घेतली नसलेने हे बांधकाम बेकायदेशीर असल्याचे आणि कर पत्रकाला त्याची नोंद नसलेचा आक्षेप घेतला आहे. वादीला जरी गुमास्ता लायसन्स दिले असले तरी देखील व्यवसायाच्या जागेची मालकी, हक्क किंवा ताबा त्याआधारे वादींना मागता येणार नाही असा त्यांनी आक्षेप घेतला आहे. वादीने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे प्रथमदर्शनी अवलोकन करता सन २०१० पासून वादी दावा मिळकतीत दुकान गाळयात 'समर्थ स्टोअर्स' या नांवाने आजतागायत व्यवसाय करीत आहे हे सिध्द होते आणि ही बाब प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाकारलेली नाही. अ.क्र.६ वरील प्रतिवादी क्र.१ यांनी वादीच्या नांवे दिलेली नोटीस पाहता वादीने प्रतिवादी क्र.२ नगरपरिषदेकडून आवश्यक ती परवानगीसाठी कार्यवाही करणार असलेचे जे लेखी कळविले होते त्याबद्दल कोणतीही कार्यवाही केलेली दिसून न आलेने प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकतीतील विद्युत पुरवठा खंडीत करणेबाबत कळविले आहे. तसेच विविध कार्यालयातून वादीचा वीज पुरवठा खंडीत

करण्याकरीता विचारणा केली जात असल्यामुळे वादीचा वीज पुरवठा प्रतिवादी क्र.२ नगरपरिषद यांच्या आदेशानुसार कायमस्वरुपी खंडीत करण्यात येईल असे कळविलेचे स्पष्ट दिसते. यावरुन प्रतिवादी क्र.१ यांनी दिलेल्या या नोटीसला प्रथमदर्शनी कोणत्याही कायदेशीर बाबीचा आधार नाही आणि प्रतिवादी क्र.२ नगरपरिषद यांच्या सांगण्यावरुन प्रतिवादी क्र.१ हे वादींचा दावा मिळकतीतील वीज पुरवठा खंडीत करु पाहत आहेत या वादींच्या कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसते.

१२. अ.क्र.०७ वर वादीने प्रतिवादी क्र.१ यांना दिलेले उत्तर पाहता प्रतिवादी क्र.२ नगरपरिषदेने दावा दुकान गाळयात तसेच इतर ८ स्टॉल धारकांना रितसर परवानगी दिलेली नाही आणि त्याबद्दल कागदपत्रांची पुर्तता सुरु आहे असे कळविले आहे. वादीला दावा मिळकतीबाबत सन २०१० साली म्हणजेच १२ वर्षांपूर्वी व्यवसाय करण्याबाबत गुमास्ता लायसन्स देण्यात आलेले आहे. हे लायसन्स सन २०१८ पर्यंत नुतनीकरण करण्यात आलेले आहे. म्हणजेच जवळ जवळ १२ वर्षे वादी दावा मिळकतीत व्यवसाय करुन त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालवित आहेत हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. दावा मिळकतीत वादीने त्यांचा व्यवसाय सुरु केला आहे अणि त्याकरीता प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून अनामत रक्कम भरुन वीज पुरवठा देखील घेतलेला आहे हे प्रथमदर्शनी सिध्द होते. अशा परिस्थितीमध्ये कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता प्रतिवादी क्र.२ नगरपरिषद प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून वादीच्या या व्यवसायाकरीता आवश्यक असलेला वीज पुरवठा खंडीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि सदरचे कृत्य हे वादीचा दावा मिळकतीत सुरु असलेला व्यवसाय वीज पुरवठयाअभावी बंद पाडून वादीला नाईलाजास्तव दावा मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रतिवादी क्र.२ यांचा प्रतिवादी क्र.१ यांना हाताशी धरुन हेतू व प्रयत्न सुरु आहे या वादीच्या कथनामध्ये मला प्रथमदर्शनी तथ्य दिसते.

१३. प्रतिवादी क्र.१ यांची अ.क्र. ०६ व ०८ वरील नोटीस पाहता त्यामधील त्यांची वादीकडून वीज बिले थकीत असलेबाबत कोठेही तक्रार केलेली नाही. प्रतिवादी क्र.२ नगरपरिषद यांनी वादीला परवानगी का दिलेली नाही याबद्दल चौकशी दरम्यान पुराव्याअंती बाब स्पष्ट होईल. दरम्यान प्रतिवादी क्र.१ यांच्या कडून दावा मिळकतीतील वीज पुरवठा खंडीत झालेस दावा मिळकतीतील वादीचा व्यवसाय बंद होऊन वादी कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊन त्यांना रस्त्यावर यावे लागेल या वादीच्या कथनामध्ये देखील मला तथ्य दिसते. वीज पुरवठा ही गरजेची बाब असल्यामुळे आणि वादीने हा वीज पुरवठा मिळणेकरीता आवश्यक त्या बाबींची पुर्तता केलेनंतरच वादीला हा वीज पुरवठा देण्यात आला असलेने त्याचा उपभोग घेण्याचा वादीला कायदेशीर अधिकार आहे आणि प्रतिवादी क्र.१ यांच्या कृत्यामुळे वादीच्या या कायदेशीर अधिकारास इजा पोहचत आहे. या सर्व बाबींचा विचार करता वादीने प्रथमदर्शनी त्यांची बाजू सिध्द केली असून या दाव्याच्या कामी चौकशी करण्याजोगे मुद्दे उपस्थित होत आहेत असे मी ठरवून ***मुद्दा क्र. १*** चे उत्तर '***होकारार्थी***'देत आहे.

**मुद्दा क्र. २ व ३ बाबतः–**

१४. वादीने मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी क्र.१ यांच्याविरुध्द पारीत केलेस प्रतिवादी क्र.१ यांचे नुकसान होण्याचे कारण नाही. याउलट वादीचे अतोनात व पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे, कारण गेली २५ वर्षे दावा मिळकतीमध्ये वीज पुरवठ्याच्या आधारे वादीचा बेकरी व्यवसाय सुरु आहे. यावरुन न्यायाचे समतोलत्व वादीच्या बाजूने आहे हे देखील स्पष्ट आहे तसे मी ठरवून ***मुद्दा क्र. २ व ३*** चे उत्तर '***होकारार्थी***' देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबतः</u>–**

१५. तुर्तातूर्त मनाईची दाद मिळण्याकरिता आवश्यक असणाऱ्या तीन अटी वादीने त्यांच्या हक्कात असलेबाबत सिद्ध केले आहे. त्यामुळे वादीचा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे या निष्कर्षापर्यंत मी येत असून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. वादीचा निशाणी ५ वरील अर्ज खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी स्वतः अथवा तर्फे इसमांमार्फत दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत दावा मिळकतीतील वादीच्या नांवे असलेला विद्युत पुरवठा बेकायदेशीरपणे खंडीत करु नये असा त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करणेत येतो.

३. वादीने दावा मिळकतीतील वीज पुरवठ्याबाबत विद्युत बिले नियमितपणे भरणा करावीत असा वादीला आदेश देण्यात येतो.

४. या अर्जाचा खर्च दाव्याचा अंतिम निर्णयामध्ये समाविष्ट करणेत यावा.

RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Digitally signed by RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Date: 2023.03.13 18:15:57 +0530

दिनांकः– १०/०३/२०२३

(श्रीमती आर.आर.बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.